Greenlawns School , Worli

इयत्ता - दहावी | Preliminary Examination - 2024-25 | पूर्णांक - ८०

दिनांक - | विषय- <u>मराठी</u> | वेळ - २ तास

सूचना:- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.

शुद्ध भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.

विभाग - अ

भाषा - विभाग (अंक - ४० )

प्रश्न १] खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा:- (१०)

i) मी अनुभवलेली बॉक्सिंगची मॅच

ii) वृक्षाचे मनोगत

iii) लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी

प्रश्न २] खालील विषयावर एक पत्र लिहा:- (७)

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त 'झाडे लावा, झाडे जगवा' या अंतर्गत रोपांचे मोफत वाटप झाले. या चांगल्या उपक्रमाबाबत व्यवस्थापक, हिरवाई ट्रस्ट, बालोद्यान मार्ग, तळेगाव दाभाडे यांचे अभिनंदन करणारे पत्र विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने लिहा.

प्रश्न ३] खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :-

हिमालयासारख्या पर्वतरांगांमध्ये राहणारे पक्षी थंडीत खाली दरीत अथवा सखल भागात उतरतात आणि उन्हाळ्यात परत वर सरकतात. त्यांचा एकूण प्रवास काही किलोमीटरचाच असतो. अनेकदा दुष्काळ, महापूर अथवा बर्फवृष्टीमुळे एखादया प्रांतात अन्न मिळेनासे झाले की पक्षी तो प्रांत सोडून तात्पुरते दुसरीकडे जातात. मुळात अन्नाचे दुर्भिक्ष हीच स्थलांतरामागची मूळ प्रेरणा आहे. पक्ष्यांना थंडी वाऱ्याची फारशी काळजी नसते. अन्नाचा पुरेसा पुरवठा असेल तर पक्षी बर्फाळ प्रांतातही व्यवस्थित जगू शकतात. एरवी दोन ते पाच हजार मीटर उंचीपर्यंत सापडणारे हिमकाक पक्षी एव्हरेस्ट चढणाऱ्या गिर्यारोहकांच्या मागे-मागे साडे आठ हजार मीटर म्हणजे सुमारे सत्तावीस हजार फुटांपर्यंत आल्याची नोंद आहे. एवढ्या उंचीवर या पक्ष्यांना बर्फ, थंडी आणि हवेची कमी होत जाणारी घनता याचा कोणत्याही प्रकारे त्रास होत असलेला दिसत नाही. हिवाळ्यात पक्षी दक्षिणेकडे स्थलांतर करतात ते थंडीमुळे नाही तर बर्फ पडून अन्न शोधणे कठीण झाल्यामुळे.

प्रश्न :

i) पक्षी आपला प्रांत सोडून दुसरीकडे का जातात ? (२)

ii) हिवाळ्यात पक्षी दक्षिणेकडे स्थलांतर का करतात ? हिमालयासारख्या पर्वतरांगांमध्ये राहणारे पक्षी कधी व कुठे उतरतात आणि सरकतात ? (२)

iii) हिमकाक पक्ष्यांविषयी सांगा. (२)

iv) पक्ष्यांना कोणत्या प्रकारचा त्रास होताना दिसत नाही ? (२)

P.T.O

v) पक्षी बर्फाळ प्रांतातही व्यवस्थित का जगू शकतात तसेच त्यांच्या स्थलांतराच्या मागची मूळ प्रेरणा काय ? (२)

## व्याकरण - विभाग

प्रश्न ४] खालील दिलेल्या निर्देशानुसार उत्तरे लिहा :- (८)

i) समानार्थी शब्द लिहा - मुबलक -

a) भरपुर b) भर्पुर c) भारपूर d) भरपूर

ii) समानार्थी शब्द लिहा - स्वर -

a) आवाज b) आव्वाज c) अवाज d) आवाझ

iii) विरुद्धार्थी शब्द लिहा - तारुण्य -

a) वार्ध्यक्या b) वर्धक्या c) वार्धक्या d) वार्धक्य

iv) विरुद्धार्थी शब्द लिहा - धाडसी -

a) भितर b) भित्रा c) भीती d) भिति

v) विरुद्धार्थी शब्द लिहा - मनाई -

a) पर्वांगी b) पर्वांगी c) परवानगी d) परवाणगी

vi) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा - मंदिरात जिथे मूर्तीची स्थापना केली जाते ती जागा -

a) गाभारा b) गाभाऱ्या c) गाभार्या d) गाभार

vii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा - बेवारशी गुरांना ठेवण्याची जागा -

a) पांजरपोल b) पांजरपोळ c) पंजरपोल d) पंजरपोळ

viii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा - मूळचे रहिवासी -

a) अदिवासी b) आदीवासी c)आदिवासी d) आदिवासीं

ix) खालील वाक्यातील रेखांकित अविकारी शब्दाचा प्रकार लिहा:- (२)

a) तो एक आनंदाचा <u>आणि</u> चैतन्याचा दिवस.

b) अब्दुल जिल्हाधिकारी कचेरी<u>जवळ</u> आला.

x) खालील वाक्यांचे प्रकार ओळखून लिहा :- (२)

a) कैलाश मंदिर फारच सुंदर आहे.

b) पांढरा रंग कोणाला आवडत नाही?

xi) खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा उपयोग करून वाक्य पुन्हा लिहा:- (१)

a) आनंदी खेळकर मुले सर्वांना आवडतात

विभाग - ब

साहित्य - विभाग (अंक -४०)

गद्य - विभाग

प्रश्न ५] अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :- (९)

i) तुम्हांला निरंजनशी मैत्री करायला आवडण्याची कारणे स्पष्ट करा.

ii) बालपणी लेखकाचा असलेला दिवसभराचा कार्यक्रम लिहा.

iii) पुस्तकांशी मैत्री करण्याचे फायदे लिहा.

आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :- (४)

i) मराठी दिन कधी व कोणामुळे साजरा केला जातो ?

ii) निरंजनचा राहिलेला शेवटचा पेपर कोणता ?

iii) वडील कोणत्या बाबतीत कडक असत ?

iv) आजीच्या तोंडून ऐकलेल्या गोष्टी लिहा.

इ) एका शब्दात उत्तरे लिहा :- (३)

i) सामन्यांना प्रेरणा देणारी -

ii) वडिलांची बदली येथे झाली -

iii) पंचनामा करणारे -

ई) कोण-कोणास म्हणाले ते लिहा:- (३)

i) “मी नापास होणार.”

ii) “हे सगळे आपलेच मित्र आहेत.”

iii) “छान निरीक्षण आहे हं तुझं.”

उ) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा:- (३)

i) ----------- साली भारतात ऑस्ट्रेलियन सर्व्हिसेसचा एक संघ पुण्यात आला होता.

ii) आता ----------- रेल्वे आल्याने रेल्वेचा छान पूल नदीवर आला. P.T.O

iii) कवितेची शब्दरचना अर्थपूर्ण व ----------- असते.

ऊ) शब्दार्थ लिहा:- गारवा , सभासद , ताल (३)

## पद्य विभाग

प्रश्न ६ ] अ) पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा:- (६)

i) पृथ्वीला वाचवण्यासाठी काय - काय करावे असे कवियत्रीला वाटते ते लिहा.

ii) 'योगी पुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे', हे विधान तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :- (२)

i) पाण्याच्या तुषारांचा रंग कोणता ?

ii) पाण्याची गोडी फक्त कोणाला सुख देते ?

इ) एका शब्दात लिहा :- (२)

i) व्यक्तीला सदैव सुख देणारा -

ii) काळी आई म्हणजे -

ई) पुढील कवितेच्या ओळींचा भावार्थ लिहा :- (२)

जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।
उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ॥

उ) शब्दार्थ लिहा:- तुष्टी , मधुरता , ताटवे (३)

समाप्त